
**राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा**

**सन :- २०२२-२३**

# -:वारली कलायात्री :-


- **सादरकर्ती :** –डॉ,संगिता राजधर महाजन.
  अधिव्याखाता,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वर्धा.
- **गट** : –अध्यापकाचार्य व पर्यवेक्षीय अधिकारी
- **प्रेरणा व मार्गदर्शन :**–डॉ.मंगेश घोगरे,
  **प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वर्धा.**



# ऋणनिर्देश

कला हे अभिव्यक्तीचे उत्कट साधन असते . कधी शब्द तर कधी चित्र हेही माध्यमं अव्यक्ताला मूर्तरुप देतात.वारली चित्रकला ही अशाच अभिव्यक्तीची ओजस्वी बाजू .परंपरेचं आभूषण ल्यालेल्या वारली पेंटिंगची आवड असल्यामुळे या चित्रकलेच्या माध्यमातून वेगळं काही तरी करण्याची आंतरिक इच्छा मनात होती आणि ती आवड जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,वर्धा येथे पूर्ण झाली.

'छंदास जेव्हा पाठबळ मिळते तेव्हा छंद एक लोकचळवळीचं रुप घेतं . याचे पूर्ण श्रेय आमचे प्राचार्य **मा.डॉ.मंगेश घोगरे साहेब** यांना जाते . माननीय घोगरे साहेबांनी वारली चित्रकला डायट वर्धाच्या इमारतीमध्ये काढण्यासाठी प्रेरणा दिली. त्यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनामुळे इमारत सुंदर रंगवता आली . त्यामुळे माननीय घोगरे साहेबांनी ही सुवर्णसंधी मिळवून दिल्याबद्दल कायम त्यांच्या ऋणात राहील . त्यासोबतच वर्धा जिल्ह्यातील कला शिक्षकांनी सदर चित्रकला भिंतींवर उतरवण्यासाठी मी केलेल्या मार्गदर्शनानुसार अप्रतिम असे वारली चित्रांचे रेखाटन केले त्याबद्दल त्यांचे देखील खूप खूप आभार . सदर कार्यशाळेसाठी शिक्षकांनी उस्फूर्त असा प्रतिसाद दिला कार्यशाळेमध्ये सहभागी होऊन सुंदर अशा पाऊल खुणा आमच्या इमारतीमध्ये उतरवल्या त्याबद्दल सर्व सहभागी शिक्षकांची देखील मी ऋणी आहे . आमच्या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेत कार्यरत सर्व अधिकारी वरिष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता व कार्यालयीन कर्मचारी यांनी वेळो वेळी सहकार्य केल्याबद्दल त्यांचे देखील खूप खूप धन्यवाद . सर्व बालगोपाल, शाळेतील विद्यार्थी जे वारली चित्रकला आपल्या शाळेतील भिंतींवर उतरवत आहेत आणि कला शिकत आहे अशा सर्व विद्यार्थ्यांची देखील खूप ऋणी आहे.

**डॉ. संगिता रा. महाजन**

**अधिव्याख्याता**

**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वर्धा**

अनुक्रमणिका


| अ.क्र | आशय | पान नं |
|---|---|---|
| 1 | संपादकीय | |
| 2 | प्रस्तावना | |
| 3 | नवोपक्रमाची गरज व महत्व | |
| 4 | नवोपक्रम उद्दिष्टे | |
| 5 | कार्यवाहीचे टप्पे | |
| 6 | कार्यवाही | |
| 7 | शिक्षकांसाठी वारली प्रशिक्षण | |
| 8 | जिल्हा कोषागार वारली | |
| 9 | अध्यापक विद्यालयांसाठी वारली कार्यशाळा | |
| 10 | जिल्हा कारागृहातील वारली | |
| 11 | फलनिष्पत्ती | |
| 12 | प्रसार माध्यमांनी घेतलेली दखल | |
| 13 | निवडक प्रतिक्रिया | |
| 14 | विद्यार्थ्यांनी शाळेत काढलेली वारली चित्रे | |
| 15 | वारली प्रमाणपत्र व फ्लिप बुक लिंक | |

## प्रस्तावना

पुरातन ऐतिहासिक वारसा असलेला वर्धा जिल्हा तसा छोटासा. वर्धा जिल्ह्यामध्ये आठ तालुके आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचे वर्धा जिल्हा हे प्रमुख केंद्र होते.महात्मा गांधीजींनी १२ वर्षे सेवाग्राम आश्रमात वास्तव्य केले. भूदान चळवळीचे प्रणेते आचार्य विनोबा भावे यांचा पवनार येथे आश्रम आहे. या व्यतिरिक्त वर्धा जिल्ह्यात गीताई मंदिर, विश्वशांती स्तूप, मगन संग्रहालय, बोर अभयारण्य आहे. थोर नेत्यांच्या चरण स्पर्शांनी पावन झालेली वर्धा भूमी जिथून बापूंनी सत्य अहिंसेचे धडे पूर्ण जगाला दिले मूलोद्योगी शिक्षणाची मुहूर्तमेढ येथून झाली.

अशा ऐतिहासिक वारसा लाभलेला वर्धा जिल्ह्यात शासकीय रुग्णालया मागे इंग्रजांच्या काळात इ.स.१९१९ मध्ये बांधलेली जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेची दगडी इमारत आहे. शासकीय अध्यापक विद्यालय, सराव पाठशाळा ते जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था असा प्रवास या इमारतीने केला आहे. ह्या इमारतीने २०१९ मध्ये १०० वर्षे पूर्ण केली आहेत. सन २०२२ मध्ये स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव संपूर्ण देशामध्ये साजरा केला जात आहे . स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत देशामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वर्धा द्वारे सुद्धा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. डायट वर्धा कार्यालयाच्या इमारतीच्या या शतकपूर्तीच्या निमित्ताने व स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व बाला उपक्रम अंतर्गत वारली पेंटिंग कार्यशाळा सदर कार्यालयात घेण्यात आली. महाराष्ट्रातील वारली आदिवासी जमातीने भारतीय समाजाला वारली कलेची देण दिलेली आहे. भारतीय सांस्कृतिक जीवनाच्या समृद्धीमागे आदिवासी कलेचा मोठा आधार आहे. वारली ही एक पुरातन कला आहे .महाराष्ट्र व गुजरात राज्याच्या सीमेवर वारली समाजाचे लोक ही कला जपत आहेत .वारली जमात महाराष्ट्रात पालघर , जव्हार, ठाणे, डहाणू व गुजरातच्या काही भागात दिसून येते .वारली पेंटिंग वारली समाजा पुरती मर्यादित न राहता सर्वत्र तिचा उपयोग होताना दिसत आहे.

गेरूने सारवलेल्या भिंतींवर तांदळाच्या पांढऱ्या पिठाने साधे व सुबक आकार रंगवण्याची पद्धत हे या चित्रशैलीचे वैशिष्ट्य समजले जाते.

वारली समाजातील महिला शेतीचे हंगाम , सण,उत्सव अशा प्रसंगी भिंतीवर वारली चित्रे काढतात. वारली जनजातीच्या देवदेवता , शेती, घर, धान्याचे कोठार , पशु, पक्षी,

विविध  कामे करणारे स्त्री पुरूष   ,  बैलगाडी अशी वारली जीवनाशी संबंधित चित्रे यामधे पहायला मिळतात.

वारली जमातीत विवाहप्रसंगी विशेष प्रकारची चित्रे काढण्याची पद्धती रूढ असल्याचे दिसते.  विवाह विधीचा महत्त्वाचा भाग म्हणून ही चित्रे शुभ मानली जातात  .  जिव्या सोमा या वारली चित्रकाराने सदर कला जगभरात पोहचविली आहे.भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ वर्षा निमित्त २०२२ साली प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून दिल्ली येथे वारली कलाकारांनी आपल्या कलेचे सादरीकरण घडविले आहे.  वारली लोकसंस्कृतीचा स्वातंत्र्यपूर्व काळापासूनचा आधुनिक काळापर्यंतचा प्रवास या कलाकारांनी ५ भित्ती चित्रांच्याद्वारे घडविला आहे.   वारली चित्रकला  वारली समाजा पुरती मर्यादित न राहता सर्वत्र तिचा उपयोग होताना दिसत आहे  . महाराष्ट्र राज्याला आदिवासी कलेचा समृद्ध वारसा लाभलेला आहे. हा वारसा जतन व संवर्धन करणे गरजेचे आहे.यासाठी पाठ्यपुस्तकातील आशयात आदिवासी जीवन,कला, संस्कृती याविषयी पाठ अंतर्भूत केलेले आहेत. इयत्ता 2 री व 6 वीच्या मराठी पाठ्यपुस्तकात वारली चित्रकला पाठ व चित्रे समाविष्ट करण्यात आलेली आहेत. वारली चित्रकलेमध्ये भौमितिक आकृत्या असल्यामुळे ही चित्रे काढण्यास सोपी आहेत. वर्तुळ, त्रिकोण, चौकोन, उभ्या-आडव्या तिरप्या रेषा यांचा उपयोग करून वारली चित्रकला काढली जाते. विद्यार्थ्यांना ही कला काढण्यास फार सोपी असल्यामुळे ही कला त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी वारली चित्रकला कार्यशाळा घेण्यात आली.

## नवोपक्रमाची गरज व महत्त्व

ऐतिहासिक वारसा लाभलेली जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वर्धा येथील दगडी इमारत आहे. या इमारतीमध्ये ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी वेगळे काहीतरी करता येईल असे मनात आले. त्या अनुषंगाने माननीय प्राचार्य मा . डॉ . मंगेश घोगरे साहेबांशी चर्चा करून हा ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी चित्रकला काढून इमारतीचे सुशोभीकरण करावे असा विचार मांडला.त्या निमित्ताने इमारतीचे सुशोभिकरण होईल, इमारतीची शतकपूर्ती साजरा करता येईल म्हणून सदर वारली कलायात्री हा नवोपक्रम हाती घेतला . तसेच शिक्षकांना प्रशिक्षित केल्यास भारतीय संस्कृतीचा ऐतिहासिक वारसा जतन करता येईल.

शिक्षकांना वारली चित्रकलेचे प्रशिक्षण दिल्यास वर्गात या कलेची जोपासना व संवर्धन होईल . वारली चित्रकला मुलांना सहज काढता येईल . वारली चित्रकलेमध्ये भौमितिक आकृत्या असल्यामुळे ही चित्रे काढण्यास सोपी आहेत. वर्तुळ, त्रिकोण, चौकोन, उभ्या-आडव्या तिरप्या रेषा यांचा उपयोग करून वारली चित्रकला काढली जाते.गणितातील गणनपूर्व क्रिया शिकण्यासाठी ह्या वारली आकृत्या उपयोगी आहेत. इयत्ता 2 री व 6 वीच्या मराठी पाठ्यपुस्तकात वारली चित्रकलेचे पाठ व चित्रे समाविष्ट करण्यात आलेली आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना ही कला शिकवणे गरजेचे आहे . इतर विषयांशी कलेचा समवाय साधणे आवश्यक आहे.वारली कलेची सांगड इतर विषयांशी घालता येते . विद्यार्थ्यांमध्ये कलेची अभिरुची निर्माण करण्यासाठी, हस्तकौशल्य विकसित करण्यासाठी , विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव देण्यासाठी , त्यांच्या अभिव्यक्तीला व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी , कलेचा वारसा टिकून राहावा, तसेच या कलेची सांगड अभ्यासक्रमाशी घालून मुलांमध्ये चित्रकलेची आवड निर्माण व्हावी यासाठी सदर नवोपक्रमाची गरज वाटली . आपल्या शाळेच्या भिंतीवर वारली कलेच्या माध्यमातून मुलांच्या डोक्यामध्ये असलेल्या कल्पकतेला वाव मिळावा . तसेच शिक्षकांना ताण तणावापासून मुक्तता मिळण्यासाठी हि कला उपयुक्त आहे . शिक्षकांच्या सृजनशीलतेला प्रोत्साहन मिळावे, कमी खर्चामध्ये शाळेच्या भिंती रंगवण्यासाठी सदर नवोपक्रम हाती घेतला.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ने अभ्यासक्रमात कला एकात्मिक शिक्षणाला अधिक महत्व दिले आहे . हे कला एकात्मिक शिक्षण साध्य करण्यासाठी कलेची अभ्यासक्रमाशी सांगड घालणे आवश्यक आहे.

कमी खर्चात ही चित्रकला काढता येते . म्हणून कमी खर्चामध्ये शालेय परिसरातील शाळेच्या भिंती रंगवण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षित करण्यासाठी वारली कलायात्री हा उपक्रम हाती घेतला.

वर्धा जिल्ह्यामध्ये मा.जिल्हाधिकारी यांच्या प्रेरणेने अप्रगत विद्यार्थी विहीन गुणवत्तापूर्ण शाळा या स्पर्धेसाठी शाळेच्या भिंती रंगविण्यासाठी बाला- BALA बिल्डींग ॲज लर्निंग एड (इमारत म्हणजे अध्ययन साहित्य) या उपक्रमाचा समावेश करण्यात आला.त्यासाठी कमी खर्चात शाळेच्या भिंती रंगवून त्याचा अध्ययन साहित्य

म्हणून विद्यार्थांना उपयोग होऊ शकतो.वारली आकृत्या वापरून शाळेच्या भिंती बोलक्या करण्यासाठी सदर प्रशिक्षणाची गरज व महत्व वाटले.

## नवोपक्रम उद्दिष्टे

वारली कलायात्री या नवोपक्रमाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१.शिक्षक व विद्यार्थी यांच्यात कलेविषयी अभिरुची निर्माण करणे.

२. कलेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचा विकास करणे.

३. कला आधारित अध्यापनशास्त्राचा अध्यापनात उपयोग करून कलेची अभ्यासक्रमाशी सांगड घालणे.

४. भारतीय सांस्कृतिक वारशाचे संरक्षण, संवर्धनवजतनकरणे.

५. शिक्षक व विद्यार्थी यांच्या कलाकौशल्यांचा विकास करणे व त्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे.

६. कमी खर्चामध्ये शालेय परिसरातील शाळेच्या भिंती रंगवण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षित करणे.

(बाला उपक्रम).

**<u>नवोपक्रमाचे नियोजन व कार्यवाहीचे टप्पे:-</u>**

मागणीनुसार प्रशिक्षण

⬇

गुगल फॉर्म द्वारे प्रशिक्षणार्थींची  नोंदणी

⬇

कार्यशाळेचे वेळापत्रक

⬇

सत्रानुसार बॅच तयार करणे

⬇

बॅच नुसार नोंदणी केलेल्या प्रशिक्षणार्थींना पत्र पाठवणे.

⬇

कार्यशाळेचे नियोजन

⬇

तीन दिवसांची कार्यशाळा

⬇

पहिल्या दिवशी मुलभूत वारली आकृती शिकवणे

⬇

दुसऱ्या दिवशी वारली पेंटिंग भिंतीवर काढण्यासाठी प्रशिक्षाणार्थींचे  गट तयार करणे

⬇

गटानुसार वारली चित्राची थीम देणे

⬇

प्रत्यक्ष भिंतीवर पेंटिंग

⬇

समारोप व प्रतिक्रिया

⬇

शाळेत अंमलबजावणी

⬇

फलनिष्पत्ती

## कार्यवाही

कलेचा वारसा टिकून राहावा, तसेच कलेची सांगड अभ्यासक्रमाशी घालून मुलांमध्ये चित्रकलेची आवड निर्माण व्हावी, तसेच आपल्या शाळेच्या भिंतीवर वारली कलेच्या माध्यमातून मुलांच्या डोक्यामध्ये असलेल्या कल्पकतेला वाव मिळावा, या सर्व बाबींचा विचार करून सन्माननीय डॉ. मंगेश घोगरे साहेब, प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वर्धा, यांच्या प्रेरणेने व डॉ. संगिता महाजन यांच्या मार्गदर्शनामध्ये तीन दिवसीय वारली पेंटिंग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. वर्धा जिल्ह्यातील आठही तालुक्यांमधून शिक्षकांनी ऑनलाइन गुगल फॉर्मद्वारे नाव नोंदविले.

केवळ शिक्षकच नव्हे तर बाल कलाकारांनी देखील या कार्यशाळेला आपली उपस्थिती लावली. या कार्यशाळेमध्ये सर्व सहभागी प्रशिक्षणार्थ्यांनी उत्साहाने जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या संरक्षण भिंतीवर वारली कलेच्या माध्यमातून आदिवासी ग्रामीण जीवन, त्यांची संस्कृती, सण, उत्सव यांचे रेखाटन करून त्यांच्या मध्ये असलेल्या कल्पकतेचे उत्तम प्रदर्शन केले आहे. या कार्यशाळेला उत्तम प्रतिसाद मिळाल्यामुळे कार्यशाळेच्या बॅचेस घेण्यात आल्या.

सदर कार्यशाळेसाठी लागणारे रंग , ब्रश व इतर साहित्य मा .मंगेश घोगरे साहेब , प्राचार्य यांनी उपलब्ध करून दिले.त्यामुळे वारली चित्रकलेचा डायट इमारती वर सराव करून घेता आला.

**टप्प्यानुसार वारली कार्यशाळाअंमलबजावणी**

| अ.क्र. | दिनांक | एकूण उपस्थित शिक्षक | वारली चित्रकलेची थीम |
|---|---|---|---|
| १ | २३ ते २५ नोव्हेंबर २१ | ३५ (शिक्षक) | ग्रामीण लोकजीवन, आनंददायी शाळा, कोरोना योद्धा, तारपा लोकनृत्य, वृक्षदिंडी. |
| २. | १ ते ३ डिसेम्बर २१ | ३२ (शिक्षक) | बेटी बचाओ–बेटी पढाओ, विठ्ठल वारी, लग्न वरात, कोरोना बाबतचा सकारात्मक दृष्टीकोन, निसर्गाकडे वाटचाल, आदिवासी देवता व विवाह सोहळा, संस्कृतीचे जतन पर्यावरणाचे रक्षण. |
| ३. | २२ ते २४ डिसेम्बर २१ | ३५ (शिक्षक) | गौतम बुद्ध, अजिंठा लेणी, महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शिवाजी महाराज, नटराज, संत गाडगेबाबा, पाणी वाचवा. |
| ४. | २७ ते २९ डिसेम्बर २१ | २० (शिक्षक) | मूलोध्योगी शिक्षण |
| ५. | २५ डिसेम्बर २१ | ३५ (जिल्हा कोषागार कार्यालयीन कर्मचारी) | विठ्ठलवारी, गांधीजी सेवाग्राम आश्रम, दांडीयात्रा, शांती स्तूप, पर्यावरण संरक्षण, पेन्शन योजना, आनंदोत्सव. |
| ६. | २७ ते २९ डिसेम्बर २१ | ४३ (अध्यापक विद्यालय) | विविध वारली आकृत्या |
| ७. | १७ ते १९जुन२०२२ | ६७ (जिल्हा कारागृह, वर्धा) | कॅनव्हासवर विविध वारली आकृत्या |

## शिक्षकांसाठी वारली प्रशिक्षण

वारली प्रशिक्षणासाठी शिक्षकांनी online मागणी करून नोंदणी केली .नोंदणीसाठी शिक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला जवळपास २३१ शिक्षकांनी नोंदणी केली .त्यांच्या प्रत्येकी ३५ याप्रमाणे बॅचेस तयार केल्या .नोंदणी केलेल्या शिक्षकांचा आदेश तयार करून तीन दिवसाच्या कार्यशाळेचे नियोजन केले.पहिल्या दिवशी वारली कलेतील मुलभूत आकृत्या शिकविल्या .दुसऱ्या दिवशी वारली फ्रेम शिकवली व गटानुसार वारली चित्र भिंतीवर काढण्यासाठी वरील तक्त्यानुसार थीम दिली .थीम नुसार कच्चे चित्र काढून तिसऱ्या दिवशी प्रत्यक्ष भिंतीवर सराव करून घेतला.डायट वर्धाच्या भिंतींवर सदर वारली चित्रे सुंदर पद्धतीने रेखाटलेली आहेत.सहभागी सर्व प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र देण्यात आले.









**-: जिल्हा कोषागार कार्यालयीन कर्मचाऱ्यांसाठी वारली चित्रकला कार्यशाळा**


जिल्हाकोषागार अधिकारी माननीय श्री . सुरज बारापात्रे साहेब यांनी डायट वर्धा येथील इमारतीची वारली पेंटिंग पाहून कोषागार कार्यालयाला देखील अशी चित्रकला काढण्यात यावी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण द्यावे अशी मागणी मा. प्राचार्य डॉ. मंगेश घोगरे साहेब यांच्याकडे केली .म्हणूननाताळच्या सुट्टीच्या दिवशी दि. 25 डिसेंबर 2021 रोजी जिल्हा कोषागार कार्यालय , वर्धा येथील कर्मचाऱ्यांसाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वर्धा येथे वारली पेंटिंग कार्यशाळा घेण्यात आली .सदर कार्यशाळेतील विविध वारली चित्र,रेखाटनामुळे सर्व कर्मचाऱ्यांना नवीन काहीतरी शिकायला मिळाल्याचा आनंद मिळाला .कोषागार कर्मचाऱ्यांनी त्यांची मुले आणि कुटुंब सहित सदर कार्यशाळेचा आनंद घेतला.तसेच कोषागार अधिकारी मा. सुरज बारापात्रे साहेब यांनी स्वतः पूर्ण वेळउपस्थित राहून सदर कार्यशाळेसाठी अनमोल असे सहकार्य केले. कर्मचाऱ्यांमधील कामाचा ताण कमी करण्यासाठी अशा कार्यशाळांचे आयोजन करण्यात यावे असेमत त्यांनी व्यक्त केले . त्यांनीदेखील स्वतःरेखाटन करून सहभाग नोंदविला .जिल्हा कोषागार कार्यालय वेगवेगळया थीम घेवून वारली चित्रकलेने रंगवले आहे.










जिल्हा कोषागार कार्यालय- पेन्शन विशेष

**-: अध्यापक विद्यालयातील अध्यापाकाचार्य व विद्यार्थ्यांसाठी वारली कार्यशाळा:-**

दि. २७ ते २९ डिसेम्बर दरम्यान वर्धा जिल्ह्यातील तीन अध्यापक विद्यालयातील ३३ विद्यार्थी शिक्षक व १० अध्यापाकाचार्य यांनी मागणी नुसार नोंदणी करून प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षणानंतर त्यांनी त्यांच्या अध्यापक महाविद्यालयातील भिंतीवर वारली चित्रकला उत्कृष्टपणे काढली.

## जिल्हा कारागृह वर्धा, वारली पेंटिंग कार्यशाळा

मा. जिल्हाधिकारी जिल्हा वर्धा यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनातून दि.१७, १८ व १९ जुन २०२२ रोजी जिल्हा कारागृह वर्धा येथे कैद्यांसाठी वारली पेंटिंग कार्यशाळा घेण्यात आली. सदर कार्यशाळेसाठी लागणारे संपूर्ण साहित्य डॉ. मंगेश घोगरे, प्राचार्य, डायट,वर्धायांनी उपलब्ध करून दिले व स्वत: पूर्ण वेळ उपस्थित राहिले. तीन दिवसीय या कार्यशाळेमध्ये जिल्हा कारागृहातील कैद्यांना वारली पेंटिंगची पार्श्वभूमी, मूलभूत आकृत्या व या आकृत्या कशा काढायच्या या विषयी मार्गदर्शन केले. पुरुष बॅरॅक मधील ५२ कैद्यांना व महिला बॅरॅकमधील १५ महिला कैद्यांना सदर प्रशिक्षण देण्यात आले.जिल्हा कारागृहातील अधीक्षक.वरिष्ठ तुरुंग अधिकारी. तुरुंग

अधिकारी यांनी उत्कृष्ट सहकार्य केले. त्यामुळे कार्यशाळा यशस्वीपणे घेता आली. पुरुष कैद्यांनी उत्तम प्रतिसाद देऊन छान अशी वारली पेंटिंग कॅनव्हासवर उतरवली. महिला कैद्यांनी देखील उत्तम प्रतिसाद नोंदविला व अतिशय उत्कृष्ट अशी वारली चित्रकला काढली. प्रत्येक कैद्याच्या चेहऱ्यावर एक वेगळा आनंद दिसत होता. वारलीमुळे वेळ कसा गेला हे त्यांना कळलेच नाही. आपल्या मध्ये देखील कला आहे आपण हे करू शकतो हा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण झाला. ताणतणावा पासून मुक्ती मिळाली व आपण केलेल्या गुन्ह्याचा विसर पडला,कलेमध्ये रमल्यामुळे आनंद झाला असे कैद्यांनी बोलून दाखवले. मा.प्राचार्यांनी कैद्यांनी काढलेल्या पेंटिंगच्या छान फ्रेम तयार करून घेतल्या व मा.जिल्हाधिकारी ,मा.उपसंचालक ,मा.शिक्षणाधिकारी यांना भेट म्हणून दिल्या.





## वारली कलायात्री उपक्रमाची फलनिष्पत्ती

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था , वर्धा कार्यालयाच्या भिंतींवर वारली चित्रकला काढली आहे . डायट वर्धा कार्यालयाच्या भिंतींवर ही कला उठून दिसत आहे. कार्यालय खूपच सुंदर व आकर्षक दिसत आहे. या निमित्ताने कार्यालयाच्या ऐतिहासिक इमारतीच्या शतकपूर्ती साजरा करता आली . तसेच स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व बाला उपक्रम यशस्वीपणे देखील घेता आला . त्यामुळे इमारतीचे अतिशय सुंदर सुशोभीकरण झाले . डायट वर्धाची इमारत सर्वांसाठी आकर्षण बनली असून येणाऱ्या जाणाऱ्यांचे लक्ष वेधून घेत आहे . शिक्षकांनी त्यांची कल्पकता या भिंतींवर उतरवून वारली कलेचा कायमस्वरूपी ठसा उमटवला आहे . त्यामुळे त्यांच्या कलेला व्यासपीठ मिळाले.

शिक्षकांची वारली चित्रकला कार्यशाळा मागणीनुसार घेतल्यामुळे शिक्षकांना त्यांच्यात असलेली कला जोपासण्याची संधी मिळाली . शिक्षकांनी भिंतीवर चित्र कधी रंगवले नव्हते , त्यांनी पहिल्यांदा हातात ब्रश घेतला. त्यामुळे वारली चित्रकला आपणही काढून विद्यार्थ्यांना शिकवू शकतो असा आत्मविश्वास शिक्षकांमध्ये निर्माण झाला . शिक्षक शाळेत विद्यार्थ्यांना वारली शिकवत आहेत . इयत्ता 2 री व 6 वीच्या मराठी पाठ्यपुस्तकात वारली चित्रकलेची पाठ व चित्रे समाविष्ट करण्यात आलेली आहेत.प्रत्यक्ष वारली काढण्याचा अनुभव विद्यार्थ्यांना मिळत आहे. वारली चित्रकलेमध्ये भौमितिक आकृत्या असल्याने ही चित्रे काढण्यास सोपी आहेत विद्यार्थी आनंदाने हि कला जोपासत आहेत.

विद्यार्थी व शिक्षक यांना वारली चित्रे भिंतीवर काढताना एक वेगळा आनंद मिळत आहे . आज शाळांच्या भिंतींवर वारली कलाकृती साकारलेली दिसत आहे . शाळा भेटी दरम्यान शाळेमध्ये विद्यार्थ्यांनी काढलेली वारली चित्रे दिसतात तेव्हा आपण घेतलेल्या कार्यशाळेची यशस्विता पाहून मनस्वी आनंद होतो . शाळेच्या

भिंतींवर, शाळेच्या परिसरात असलेल्या विहिरीवर , झाडांच्या बुंध्यावर , कुंड्यांवर, पाण्याच्या टाकीवर, दरवाजावर, शाळेच्या गेटवर सर्वत्र वारली दिसत आहे. वारली चित्रकलेमुळे मुलांच्या सर्जनशीलतेला वाव मिळाला. बॅच नुसार whatsapp group तयार केला आहे. या ग्रुपवर विद्यार्थ्यांनी काढलेली वारली चित्रे, पोस्टर्स शिक्षक शेअर करतात . वारली चित्र काढण्यात मुले दंग झालेली दिसत आहेत . शाळेतील सर्व वातावरण वारलीमय झालेले दिसत आहे . वारली आकृत्यांचा उपयोग करून विविध थीमचा उपयोग करून वारली कलेला आधुनिक रूप प्राप्त झालेले आहे . उदा. योगासने वारली आकृत्याच्या माध्यमातून शाळेत काढलेली दिसत आहे , वारली एक्सप्रेस , दांडीयात्रा, सेवाग्राम आश्रम , शांती स्तूप , इ . विविध विषयांवर वारली चित्रकला शाळांमध्ये काढलेल्या दिसत आहेत . सामाजिक संदेश देणाऱ्या वारली उदा. झाडे लावा झाडे जगवा, बेटी बचाओ बेटी पढाओ,स्कूल चले हम,स्वच्छ विद्यालय इ.

वारली चित्रकलेत वर्तुळ , त्रिकोण, उभ्या, आडव्या, तिरप्या रेषा या भौमितिक आकृत्यांचा समावेश असल्याने या कलेचा समवाय गणित , भूमिती, भूगोल, भाषा, इतिहास या विषयांशी केला जात आहे . या आकृत्यांमुळे विद्यार्थ्यांना गणितातील गणन पूर्व क्रिया ,आकृतिबंध,इंग्रजीतील action words सहज शिकता येत आहेत.कला आधारित अध्यापनशास्त्राचा अध्यापनात उपयोग करून कलेची अभ्यासक्रमाशी सांगड घातली जात आहे . वारली चित्रकला ही भारतीय संस्कृतीचा वारसा आहे . हि पुरातन कला आहे . त्यामुळे भारतीय सांस्कृतिक वारशाचे संरक्षण, संवर्धन व जतन भावी पिढीकडून होत आहे . शिक्षक व विद्यार्थी यांच्या कला कौशल्यांचा विकास होत आहे . वारली चित्रकलेतून त्यांच्या सृजनशीलतेला व्यासपीठ मिळाले . वर्धा जिल्ह्यामध्ये बाला उपक्रम राबवला जात आहे . वारली चित्रकला काढल्यामुळे बिल्डींग अ‍ॅज लर्निंग एड (इमारत म्हणजे अध्ययन साहित्य ) या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होताना दिसत आहे . कमी खर्चामध्ये शाळेची इमारत रंगवणे होत असून इमारतीचे सुशोभीकरण होत आहे . वारली आकृत्या संगणकावर काढून त्या आकृत्यांना अ‍ॅनिमेशन देवून विद्यार्थी वारलीचा आनंद घेत आहेत.

जिल्हा कोषागार कार्यालयातील कर्मचारी यांना वारली चित्रकला शिकविल्यामुळे एक वेगळी कला शिकल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता . कामाच्या ताण तणावापासून त्यांना मुक्ती मिळाली , स्वतः मध्ये असलेल्या कलेचा आविष्कार करता आला . आपणही छान चित्रे काढू शकतो हा आत्मविश्वास त्यांच्यात वाढला. दैनदिन कामापेक्षा वेगळे कार्य केल्याचा व नवीन कला शिकल्याचा आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसत होता. काही कर्मचारी हि कला शिकण्यासाठी त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना घेवून आले होते . लहान बाल गोपलानी हि कला शिकून रोपाच्या कुंड्यांवर वारली चित्रे काढली . जिल्हा कोषागार कार्यालयाच्या भिंतींवर हि वारली चित्रे काढून घेतली. त्यामुळे कोषागार कार्यलयाच्या भिंती आकर्षक व सुंदर दिसत आहेत.

जिल्हा कारागृह वर्धा येथील कैद्यांसाठी वारली चित्रकला कार्यशाळा घेतल्यामुळे त्यांच्यातील कलेला अभिव्यक्त होण्याची संधी मिळाली . त्यांच्यावर असलेला ताण तणाव यापासून मुक्तता मिळाली . कार्यशाळेच्या तीन दिवसांमध्ये कैद्यांना त्यांच्या गुन्ह्याचा विसर पडला तसेच सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होण्यास मदत झाली असे त्यांनी मनोगतात सांगितले . कैद्यांचे मानसिक आरोग्य विकसित होण्यासाठी देखील हि कार्यशाळा उपयुक ठरली. सर्व कैदी आनंदाने सहभागी झाले व आपली कला त्यांनी कॅनव्हासवर उतरवली . या पेंटींगच्या छान फोटो फ्रेम तयार करून मा . जिल्हाधिकारी, शिक्षणाधिकारी यांना भेट म्हणून आदरणीय प्राचार्य डॉ . घोगरे साहेबांनी दिल्या . या कार्यशाळेमुळे कैदी आनंदी झाले व आणखी अशीच कार्यशाळा घ्यावी म्हणून मागणी केली.

वर्धा जिल्ह्यामध्ये वारली चित्रकला सर्वत्र दिसत आहे खासकरून शाळांच्या भिंतींवर सुंदर कलाकृती दिसत आहे. जिल्ह्यामध्ये चांगला उपक्रम घेतल्याचा मनस्वी आनंद होत आहे.












जीवन सुंदर करण्यासाठी तीन गुणांची आवश्यकता असते.










वारली पेंटिंग

<u>विविध प्रसार माध्यमांनी वारली कार्यशाळेची घेतलेली दाखल</u>

**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था , वर्धा यांनी जिल्हातील शिक्षकांसाठी राबविलेल्या वारली उपक्रमाची व जिल्ह्यातील शाळा वारलीमय झाल्याची सह्याद्री वाहिनीने घेतलेली दखल**

https://youtu.be/1ByRWc3UKoQ






दीपचंद विद्यालयातील सुभाष राठोड या शिक्षकाने वारली चित्रकलेच्या माध्यमातून सामाजिक संदेश देणाऱ्या अनेक वारली कलाकृतीच्या माध्यमातून शाळेच्या भिंती बोलक्या केल्या ज्याची दखल जय महाराष्ट्र चॅनेलने घेतली.

**https://youtu.be/o5wLRPLhRS0**



# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत वारली पेंटिंग

वर्धा, ब्यूरो.कलेचा वारसा टिकून राहावा, तसेच या कलेची सांगड अभ्यासक्रमाशी घालून मुलांमध्ये चित्रकलेची आवड निर्माण व्हावी. तसेच आपल्या शाळेच्या भिंतीवर वारली कलेच्या माध्यमातून मुलांच्या डोक्यामध्ये असलेल्या कल्पकतेला वाव मिळावा, या सर्व बाबींचा विचार करून डॉ. मंगेश डोंगरे यांच्या प्रेरणेने व डॉ. संगीता महाजन यांच्या मार्गदर्शनात तीन दिवसीय वारली पेंटिंग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेला उत्तम प्रतिसाद मिळत असून वर्धा जिल्ह्यातील आठही तालुक्यांमधून शिक्षकांनी ऑनलाइन गुगल फॉर्मद्वारे नाव नोंदविले. केवळ शिक्षकच नव्हे तर बालकलाकार देखील या कार्यशाळेला उपस्थिती दर्शवित आहेत. या कार्यशाळेमध्ये सर्व सहभागी प्रशिक्षणार्थ्यांनी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या संरक्षण भिंतीवर वारली कलेच्या माध्यमातून आदिवासी ग्रामीण जीवन, त्यांची संस्कृती,सण, उत्सव व ऐतिहासिक घटनांचे रेखाटन करून त्यांच्यामध्ये असलेल्या कल्पकतेचे उत्तम प्रदर्शन केलेले आहे. जिल्हा कोषागार कार्यालय, वर्धा येथील कर्मचाऱ्यांसाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वर्धा येथे वारली पेंटिंग कार्यशाळा घेण्यात आली. जिल्हा कोषागार अधिकारी सुरज बारपात्रे यांनी डायट वर्धा येथील इमारतीची वारली पेंटिंग पाहून कोषागार कार्यालयाला देखील अशी चित्रकला काढण्यात यावी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण द्यावे, अशी मागणी प्राचार्य डॉक्टर मंगेश घोगरे यांच्याकडे केली होती.

## नवीन शिकायला मिळाल्याचा आनंद

नाताळच्या दिवशी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थाअधिव्याख्याता, डॉ. संगीता महाजन यांच्या मार्गदर्शनात घेण्यात कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेला प्राचार्य डॉ. मंगेश घोगरे यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेतील विविध कृतींमुळे, चित्र रेखाटनामुळे कर्मचाऱ्यांना नवीन काहीतरी शिकायला मिळाल्याचा आनंद मिळाला. कोषागार अधिकारी सुरज बालपात्रे यांनी सहकार्य केले. सदर कार्यशाळा डॉ. संगीता महाजन यांच्या संकल्पनेतून आणि डायट प्राचार्य डॉ. मंगेश घोगरे यांच्या मार्गदर्शनात घेण्यात येते.

# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व बाल उपक्रमअंतर्गत वारली पेंटिंग कार्यशाळा

देशोन्नती वृत्तसंकलन...



**वर्धा** ■ कलेचा वारसा टिकून राहावा, तसेच या कलेची सांगड अभ्यासक्रमाशी घालून मुलांमध्ये चित्रकलेची आवड निर्माण व्हावी, तसेच आपल्या शाळेच्या भिंतीवर वारली कलेच्या माध्यमातून मुलांच्या डोक्यामध्ये असलेल्या कल्पकतेला वाव मिळावा, याकरिता तीन दिवसीय वारली पेंटिंग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. मंगेश घोगरे यांच्या यांच्या प्रेरणेने व डॉ. संगीता महाजन, अधिव्याख्याता यांच्या मार्गदर्शनामध्ये ही कार्यशाळा घेण्यात आली. ही कार्यशाळेची तिसरी बॅच असून या कार्यशाळेला उत्तम प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यातील आठही तालुक्यामधून शिक्षकांनी ऑनलाइन गुगल फॉर्मद्वारे नाव नोंदविले. केवळ शिक्षकच नव्हे तर बालकलाकारांनीही या कार्यशाळेला आपली उपस्थिती लावली आहे. या कार्यशाळेमध्ये सर्व सहभागी प्रशिक्षणार्थ्यांनी उत्साहाने जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या संरक्षण भिंतीवर वारली कलेच्या माध्यमातून आदिवासी ग्रामीण जीवन, त्यांची संस्कृती, सण, उत्सव व ऐतिहासिक घटनांचे रेखाटन करून त्यांच्यामध्ये असलेल्या कल्पकतेचे उत्तम प्रदर्शन केलेले आहे.

२५ डिसेंबर रोजी जिल्हा कोषागार कार्यालय, वर्धा येथील कर्मचाऱ्यांसाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वर्धा येथे वारली पेंटिंग कार्यशाळा घेण्यात आली. जिल्हा कोषागार अधिकारी सुरज वारपाते यांनी डायट वर्धा येथील इमारतीची वारली पेंटिंग पाहून कोषागार कार्यालयाला देखील अशी चित्रकला काढण्यात यावी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण द्यावे, अशी मागणी प्राचार्य डॉ. मंगेश घोगरे यांच्याकडे केली होती. नाताळच्या सुट्टीच्या दिवशी डॉ. संगीता महाजन अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या कार्यशाळा घेण्यात आली. सदर कार्यशाळा घेण्यासाठी प्राचार्य डॉ. मंगेश घोगरे यांनी मार्गदर्शन केले.

सदर कार्यशाळेतील विविध कृतीमुळे, चित्र रेखाटनामुळे सर्व कर्मचाऱ्यांना नवीन काहीतरी शिकायला मिळाल्याचा आनंद मिळाला. त्यांचा आनंद द्विगुणित झाला. कोषागार कर्मचाऱ्यांनी त्यांची मुलं आणि कुटुंबासहित सदर कार्यशाळेचा आनंद घेतला. कोषागार अधिकारी सुरज वारपाते यांनी स्वतः पूर्ण वेळ उपस्थित राहून सदर कार्यशाळेसाठी सहकार्य केले. कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी करण्यासाठी अशा कार्यशाळांचे आयोजन करण्यात यावे, असे मत त्यांनी व्यक्त केले. त्यांनीदेखील स्वतः रेखाटन करून सहभाग नोंदविला. सदर कार्यशाळा डॉ. संगीता महाजन अधिव्याख्याता, डायट वर्धा यांच्या संकल्पनेतून आणि डायट प्राचार्य डॉक्टर मंगेश घोगरे यांच्या प्रेरणेने यशस्वीरीत्या डायट वर्धा येथे घेण्यात येत आहेत.

# भिंतीवर उतरत आहे विद्यार्थ्यांची कल्पकता

## स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व बाला उपक्रमाअंतर्गत वारली पेंटिंग कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**



वर्धा, ता. २६ : कलेचा वारसा टिकून राहावा, तसेच या कलेची सांगड अभ्यासक्रमाशी घालून मुलांमध्ये चित्रकलेची आवड निर्माण व्हावी, तसेच शाळेच्या भिंतीवर वारली कलेच्या माध्यमातून मुलांच्या डोक्यामध्ये असलेल्या कल्पकतेला वाव मिळावा, या करता जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या वतीने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व बाला उपक्रम अंतर्गत वारली पेंटिंग कार्यशाळा आयोजित केली.

कार्यशाळेची ही तिसरी बॅच असून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. मंगेश डोंगरे यांच्या प्रेरणेने व अधिव्याख्याता डॉ. संगीता महाजन यांच्या मार्गदर्शनामध्ये तीन दिवसीय वारली पेंटिंग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. जिल्ह्यातील आठही तालुक्यामधून शिक्षकांनी ऑनलाइन गुगल फॉर्मद्वारे नाव नोंदविले. केवळ शिक्षकच नव्हे तर बालकलाकार देखील या कार्यशाळेला आपली उपस्थिती लावत आहेत. या कार्यशाळेमध्ये सर्व सहभागी प्रशिक्षणार्थ्यांनी उत्साहाने जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या संरक्षण भिंतीवर वारली कलेच्या माध्यमातून ग्रामीण जीवन, संस्कृती, सण, उत्सवाचे रेखाटन केले आहे.

**कोषागाराच्या कर्मचाऱ्यांनाही दिले प्रशिक्षण**

जिल्हा कोषागार कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांसाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, येथे वारली पेंटिंग कार्यशाळा घेण्यात आली. जिल्हा कोषागार अधिकारी सूरज वारपाते यांनी डायट येथील इमारतीची वारली पेंटिंग पाहून कोषागार कार्यालयाला देखील अशी चित्रकला काढण्यात यावी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण द्यावे अशी मागणी प्राचार्य डॉ. मंगेश घोगरे यांच्याकडे केली होती. नाताळच्या सुट्टीच्या दिवशी ही कार्यशाळा घेण्यात आली. सदर कार्यशाळेतील विविध कृतीमुळे, चित्र रेखाटनामुळे सर्व कर्मचाऱ्यांना नवीन काहीतरी शिकायला मिळाल्याचा आनंद मिळाला. त्यांचा आनंद द्विगुणित झाला. कोषागार कर्मचाऱ्यांनी त्यांची मुले आणि कुटुंबासहित सदर कार्यशाळेचा आनंद घेतला. कर्मचाऱ्यांमधील कामाचा ताण यातून कमी झाला.

# वारली पेंटिंग कार्यशाला को प्रतिसाद

## स्कूल के दीवारों पर निकाली आकर्षक कलाकृति



**वर्धा (प्रशांत आजनकर)** - कलाकृति का जतन करना जरुरी हैं. बच्चों में चित्रकला के प्रति रुचि निर्माण हो इसके लिए प्रयास किए जा रहे हैं. इस उद्देश्य से वारली पेंटिंग कार्यशाला का आयोजन किया गया था. जिसे भारी प्रतिसाद मिला. प्राचार्य डा. मंगेश डोंगरे, डा. संगीता महाजन ने योग्य मार्गदर्शन किया. जिले के 8 तहसील के शिक्षकों ने ऑनलाइन फार्म भरकर पंजीयन किया था. शाला के दीवारों पर आकर्षक पेंटिंग निकाली गई. आदिवासी ग्रामीण जीवन संस्कृति, उत्सव व ऐतिहासिक घटना का वर्णन वारली के माध्यम से किया गया. मान्यवरों ने भी यथोचित मार्गदर्शन इस समय किया.



---

पुण्य नगरी

# बाला उपक्रमांतर्गत वारली पेंटिंग कार्यशाळा



**पुण्य नगरी** / प्रतिनिधी

**वर्धा** : कलेचा वारसा टिकून राहावा, तसेच या कलेची सांगड अभ्यासक्रमाशी घालून मुलांमध्ये चित्रकलेची आवड निर्माण व्हावी. तसेच आपल्या शाळेच्या भिंतीवर वारली कलेच्या माध्यमातून मुलांच्या डोक्यामध्ये असलेल्या कल्पकतेला वाव मिळावा, याकरिता जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वर्धा, प्राचार्य डॉ. मंगेश डोंगरे, अधिव्याख्याता डॉ. संगीता महाजन यांच्या मार्गदर्शनामध्ये तीन दिवसीय वारली पेंटिंग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळेची तिसरी बॅच असून या कार्यशाळेला उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

वर्धा जिल्ह्यातील आठही तालुक्यामधून शिक्षक व बाल कलाकारांनी कार्यशाळेला उपस्थिती लावली. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या संरक्षण भिंतीवर वारली कलेच्या माध्यमातून आदिवासी ग्रामीण जीवन, त्यांची संस्कृती, सण, उत्सव व ऐतिहासिक घटनांचे रेखाटन करून त्यांच्यामध्ये असलेल्या कल्पकतेचे उत्तम प्रदर्शन केलेले आहे. २५ डिसेंबर रोजी जिल्हा कोषागार कार्यालय, वर्धा येथील कर्मचारी व जिल्हा कोषागार अधिकारी सुरज बारपात्रे यांनी भेट देऊन पाहणी केली.

Smart Wardha
Page No.3 December 27, 2021

---

नवभारत

पहल | आजादी का अमृत महोत्सव में लिया उपक्रम, जिला शिक्षा व प्रशिक्षण संस्था का आयोजन

# बाल कलाकारों की पेंटिंग बनी आकर्षण

■ **वर्धा,** ब्यूरो. कला की विरासत को सुरक्षित किया जाना चाहिए और इस कला को पाठ्यक्रम में शामिल करके बच्चों में चित्रकला के प्रति प्रेम निर्माण करने के उद्देश्य से जिला शिक्षा एवं प्रशिक्षण संस्था के प्राचार्य डा.मंगेश घोगरे की प्रेरणा से तथा अधिव्याख्याता डा. संगीता महाजन के मार्गदर्शन में तीन दिवसीय वारली पेंटिंग कार्यशाला का आयोजन किया गया. कार्यशाला में शिक्षकों के साथ ही बालकलाकारों ने सहभाग लेकर उत्कृष्ट वारली पेंटिंग साकार कर दिखाई.



## सुरक्षा दीवार पर उकेरे संस्कृति से जुड़े चित्र



कार्यशाला की तीसरी बैच है, जिसे उत्कृष्ट प्रतिसाद मिल रहा है. जिले के सभी तहसील मे शिक्षकों का आनलाइन गुगल फार्म से पंजीयन किया जा रहा है. मात्र शिक्षक ही नही तो बालकलाकार कार्यशाला मे उपस्थित हो रहे है. कार्यशाला मे शामिल सभी प्रशिक्षणार्थी उत्साह से जिला शिक्षा व प्रशिक्षण संस्था की सुरक्षा दीवार पर वारली कला के माध्यम से आदिवासी ग्रामीण जीवन, उनकी संस्कृति, त्यौहार व ऐतिसासिक घटनाओं का चित्रण कर अपनी कल्पकता का उत्कृष्ट प्रदर्शन कर रहे है.

## क्रिसमस पर्व के उपलक्ष्य में ली कार्यशाला

क्रिसमस के अवसर पर जिला कोषागार कार्यालय में कर्मचारियों के लिए जिला शिक्षा व प्रशिक्षण संस्था, में वारली पेंटिंग कार्यशाला ली गई. जिला कोषागार अधिकारी सूरज बारपात्रे द्वारा डायट के इमारत की वारली पेंटिंग देखकर कोषागार कार्यालय में इस प्रकार की चित्रकला साकार करने की मांग प्राचार्य डा.मंगेश घोगरे से की थी .

## कर्मचारियों का तनाव दूर करने पर जोर

कार्यशाला के अंतर्गत चित्र साकार करने का अवसर मिलने से कर्मचारियों ने अपनी खुशी व्यक्त की. इस कार्यशाला में कोषागार कर्मचारियों ने बच्चों तथा परिजनों के साथ इस कार्यशाला का लाभ लिया . कोषागार अधिकारी सूरज बालपात्रे ने स्वयं पूर्ण समय देकर कार्यशाला के लिए सहयोग किया. कर्मचारियों के कार्य का तनाव दूर करने के लिए यह कार्यशाला आयोजित करने की भावना उन्होंने व्यक्त की.

Wardha Edition
27-december-2021 Page No. 4
epaper.enavabharat.com

छंद **जिल्हा शिक्षण, प्रशिक्षण संस्थेचा पुढाकार**

# बंदिवानांना वारली पेंटिंगचे धडे

**वर्धा.** ब्युरो. जिल्हा कारागृहातील बंदी बांधवांना कारागृहातून बाहेर पडल्यानंतर आत्मसन्मानाने जगता यावे यासाठी जिल्हाधिकारी प्रेरणा देशभ्रतार यांच्या पुढाकाराने विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येत आहे. याच उपक्रमांतर्गत बंदी बांधवांसाठी कारागृहात वारली पेंटींगची कार्यशाळा घेण्यात आली. बंदी बांधवांनी वारलीचे धडे आत्मसात केले. 67 त्यात महिला बंदींचा देखील सहभाग होता.

जिल्हाधिकाऱ्यांच्या पुढाकाराने यापुर्वी 120 बंदींना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात आले. दुसऱ्या टप्प्यात आणखी इतक्याच बंदींना प्रशिक्षण दिले जाणार आहे.जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्यावतीने सदर वारली पेंटींग कार्यशाळा आयोजित करण्यात आली. संस्थेचे प्राचार्य डॉ.मंगेश घोगरे यांनी विशेष पुढाकार घेऊन तीन दिवसीय कार्यशाळा कारागृहात घेतली. संस्थेच्या अधिव्याख्याता डॉ.संगीता महाजन यांनी बंदी बांधवांना वारली पेंटींगची पार्श्वभूमी, मूलभूत आकृत्या व या आकृत्या कशा काढायच्या याविषयी मार्गदर्शन केले. पुरुष बॅरेकमधील 52 तर महिला बॅरेकमधील 15 महिला बंदींनी कार्यशाळेदरम्यान वारली पेंटींगचे बारकावे आत्मसात केले. कार्यशाळेसाठी कारागृह अधीक्षक सुहास पवार, वरिष्ठ तुरुंग अधिकारी नितीन क्षिरसागर, तुरुंग अधिकारी संघमित्रा शेळके यांनी कारागृहात चांगले वातावरण निर्माण करून दिले. प्रशिक्षणासाठी लागणारे सर्व साहित्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्यावतीने उपलब्ध करून देण्यात आले. तीन दिवसाच्या या कार्यशाळेत प्रशिक्षकांनी बंदींकडून चांगले पेंटींग देखील तयार करून घेतले. पुरुषांसह महिला बंदींनी देखील उत्तम वारली पेंटींग रेखाटली.

प्रशिक्षण कार्यशाळेसाठी प्राचार्य डॉ.घोगरे यांच्यासह त्यांचे सहकारी डॉ.संगिता महाजन, अधिव्याख्याता प्रतिभा देशपांडे, साधन व्यक्ती दीपक आखाडे, विनोद धोबे, अंजली कदम यांनी तीन दिवस कारागृहात बंदीबांधवांसोबत वेळ घालवून कार्यशाळा यशस्वी केली. या कार्यशाळेमुळे बंदी बांधवांना आपल्या कलेच्या सादरीकरणाची संधी मिळाली.



### कारागृहातच राबविले जाताहेत उपक्रम

या प्रशिक्षणामुळे कारागृहातून बाहेर पडल्यावर बंदींना स्वत:चा रोजगार उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. बंदी बांधवांमध्ये विविध प्रकारचे कौशल्य, कला असतात. परंतु नाईलाजाने त्यांना कला, कौशल्यापासून दुर राहावे लागते. कारागृहातून बाहेर पडल्यानंतर त्यांना समाजात रुजता यावे, आत्मसन्मानाने जगता यावे, यासाठी प्रशासनाच्यावतीने विविध उपक्रम कारागृहातच राबविले जात आहे.

---

# जिल्हा कारागृहातील बंदी बांधवांनी गिरविले वारली पेंटींगचे धडे

**कारागृहातील ६७ बंदींना वारलीचे प्रशिक्षण : जिल्हा शिक्षण, प्रशिक्षण संस्थेचा पुढाकार**

देशोन्नती वृत्तसंकलन...





**वर्धा** ■ जिल्हा कारागृहातील बंदी बांधवांना कारागृहातून बाहेर पडल्यानंतर आत्मसन्मानाने जगता यावे, यासाठी जिल्हाधिकारी प्रेरणा देशभ्रतार यांच्या पुढाकाराने विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येत आहे. याच उपक्रमांतर्गत बंदी बांधवांसाठी कारागृहात वारली पेंटींगची कार्यशाळा घेण्यात आली. ६७ बंदी बांधवांनी वारलीचे धडे आत्मसात केले. त्यात महिला बंदींचा देखील सहभाग होता.

जिल्हाधिकाऱ्यांच्या पुढाकाराने यापूर्वी १२० बंदींना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात आले. दुसऱ्या टप्प्यात आणखी इतक्याच बंदींना प्रशिक्षण दिले जाणार आहे. या प्रशिक्षणामुळे कारागृहातून बाहेर पडल्यावर बंदींना स्वत:चा रोजगार उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. बंदी बांधवांमध्ये विविध प्रकारचे कौशल्य, कला असतात, परंतु नाईलाजाने त्यांना कला, कौशल्यापासून दूर राहावे लागते. कारागृहातून बाहेर पडल्यानंतर त्यांना समाजात रुजता यावे, आत्मसन्मानाने जगता यावे, यासाठी प्रशासनाच्या वतीने विविध उपक्रम कारागृहातच राबविले जात आहे.

जिल्हा शिक्षण, प्रशिक्षण संस्थेच्या वतीने सदर वारली पेंटींग कार्यशाळा आयोजित करण्यात आली. संस्थेचे प्राचार्य डॉ.मंगेश घोगरे यांनी विशेष पुढाकार घेऊन तीन दिवसीय कार्यशाळा कारागृहात घेतली. संस्थेच्या अधिव्याख्याता डॉ. संगीता महाजन यांनी बंदी बांधवांना वारली पेंटींगची पार्श्वभूमी, मूलभूत आकृत्या व या आकृत्या कशा काढायच्या याविषयी मार्गदर्शन केले. पुरुष बॅरेकमधील ५२ तर महिला बॅरेकमधील १५ महिला बंदींनी कार्यशाळेदरम्यान वारली पेंटींगचे बारकावे आत्मसात केले.

कार्यशाळेसाठी कारागृह अधीक्षक सुहास पवार, वरिष्ठ तुरुंग अधिकारी नितीन क्षीरसागर, तुरुंग अधिकारी संघमित्रा शेळके यांनी कारागृहात चांगले वातावरण निर्माण करून दिले. प्रशिक्षणासाठी लागणारे सर्व साहित्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आले. तीन दिवसाच्या या कार्यशाळेत प्रशिक्षकांनी बंदींकडून चांगले पेंटींग देखील तयार करून घेतले. पुरुषांसह महिला बंदींनी देखील उत्तम वारली पेंटींग रेखाटली.

प्रशिक्षण कार्यशाळेसाठी प्राचार्य डॉ.घोगरे यांच्यासह त्यांचे सहकारी डॉ. संगीता महाजन, अधिव्याख्याता प्रतिभा देशपांडे, साधन व्यक्ती दीपक आखाडे, विनोद धोबे, अंजली कदम यांनी तीन दिवस कारागृहात बंदीबांधवांसोबत वेळ घालवून कार्यशाळा यशस्वी केली. या कार्यशाळेमुळे बंदी बांधवांना आपल्या कलेच्या सादरीकरणाची संधी मिळाली.

---

# कैदियों ने सीखे वारली पेंटिंग के गुर

## जेल के 67 कैदियों को दिया प्रशिक्षण

■ **वर्धा,** ब्यूरो जिला कारागार में सजा काट रहे कैदी मुक्त होने के बाद आत्मसम्मान से जीवनयापन कर सके, इस उद्देश्य से जिलाधिकारी प्रेरणा देशभ्रतार की पहल से विभिन्न उपक्रम चलाए जा रहे हैं. इस उपक्रम के अंतर्गत कैदियों के लिए जेल में वारली पेंटिंग की कार्यशाला ली गई. 67 कैदियों को वारली पेंटिंग के गुर सिखाए गए, जिसमें महिला कैदियों का भी समावेश था. जिलाधिकारी की पहल से इसके पूर्व 120 कैदियों को कौशल्य विकास का प्रशिक्षण दिया गया. दूसरे चरण में और इतने ही कैदियों को प्रशिक्षण दिया जाने वाला है. प्रशिक्षण से जेल से मुक्त होने के बाद स्वयं का रोजगार निर्माण करने कैदी सक्षम रहेंगे. कैदियों में विभिन्न कौशल व कला रहने के बावजूद वंचित रहना पड़ता है. उन्हें आत्मसम्मान प्रदान करने के उद्देश्य से प्रशासन की ओर से विभिन्न उपक्रम जेल में चलाए जा रहे है.



### जिला शिक्षा व प्रशिक्षण संस्था ने ली कार्यशाला

जिला शिक्षा व प्रशिक्षण संस्था की ओर से वारली पेंटिंग की कार्यशाला आयोजित की गई. संस्था के प्राचार्य डा. मंगेश घोगरे ने विशेष पहल कर तीन दिवसीय कार्यशाला जेल में ली. संस्था के अधिव्याख्याता डा.संगीता महाजन ने कैदियों को वारली पेंटिंग का इतिहास, मूलभूत आकृति व आकृति कैसे तैयार करने के बारे में मार्गदर्शन किया. पुरुष बैरेक के 52 तथा महिला बैरेक की 15 महिला कैदियों ने कार्यशाला दौरान वारली पेंटिंग के गुर आत्मसात किए.

### कला को प्रस्तुत करने का मिला अवसर

कार्यशाला के लिए जेल अधीक्षक सुहास पवार, वरिष्ठ जैल अधिकारी नितिन क्षीरसागर, अधिकारी संघमित्रा शेलके ने जैल में अच्छा वातावरण निर्माण कर दिया. प्रशिक्षण सामग्री जिला शिक्षा व प्रशिक्षण संस्था की ओर से उपलब्ध की गई. तीन दिनों से कार्यशाला के लिए लगने वाली सामग्री जिला शिक्षा व प्रशिक्षण संस्था ने उपलब्ध कराई. तीन दिनों की कार्यशाला में प्रशिक्षकों ने कैदियों से अच्छे पेंटिंग तैयार करवाए. पुरुषों के साथ ही महिला कैदियों ने सुंदर वारली पेंटिंग तैयार कर प्रतिसाद दिया. प्रशिक्षण कार्यशाला के लिए प्राचार्य डा. घोगरे समेत उनके सहयोगी डा.संगीता महाजन, अधिव्याख्याता प्रतिभा देशपांडे, दिपक आखाडे, विनोद धोबे, अंजलि कदम ने तीन दिन जेल के कैदियों के साथ बिताकर कार्यशाला सफल की. कैदियों को कला प्रस्तुति का अवसर मिला.

# निवडक प्रतिक्रिया

## कलेचा प्रवास

कलेचे स्थान मनुष्याच्या जीवनात महत्वाचे. कला ही मनुष्याला समृद्ध बनविते म्हणून जीवनात कोणतीतरी कला शिकने आवश्यक आहे.वारली चित्रकला यावरील वर्ग ६ वी मध्ये मराठी विषयात एक पाठ आहे त्यात वारली चित्रकला विषयी माहिती दिलेली आहे. ती मी वाचली आणि अचानक वारली चित्रकलेचे प्रशिक्षणास मला जावे लागले त्या प्रशिक्षणाच्या मार्गदर्शक होत्या डॉ. संगीता महाजन मॅडम !त्यांची कला शिकविण्याची कला व हुन्नर अगदी वाखाणण्याजोगे असेच.त्यांनी प्रत्यक्ष कुंचला हातात घेवून चित्र रेखाटण्यास लावले हा जो अनुभव आम्ही घेतला त्याचा आनद अवर्णनीय आहे. अनुभवातून तयार झालेली पेंटीग बघून आमच्या डोळयाचे पारणे फिटले आम्ही जेव्हा शाळेत गेलो त्यावेळेस चित्रकला व कार्यानुभव या तासिकांमध्ये वारली पेंटींगचे धडे मुलांना दिले मुले अक्षरशः मग्न होवून ते धडे गिरवत होते चेहर्यावरील हास्य व भिंतीवरील चित्र बरेच काही सांगून गेले लोप पावलेली आदिवासी कला परत पुनरुज्जवीत झाली आमचे गाव आदीवासी बहुल असलेले असल्याने त्यांना सुद्धा या कलेचा अभिमान वाटला .प्रत्येक वर्गातील ही बोलकी भिंत पाहून येणारे जाणारे मंडळी देखील मुलांना कौतुकाची थाप देतात. असा हा कलेचा प्रवास सुरू झाला त्याचे खरे श्रेय आमच्या मार्गदर्शक डॉ. संगीता महाजन मॅडम यांना जाते कधी काळी लोप पावलेली ही कला , आदीवासी चित्रकला ही आता घरोघरी नांदते आहे एवढेच नव्हे तर परदेशास सुद्धा अभिमानाने वास्तव्य करीत आहे. हे पाहून मनाला हायसे वाटते , मॅडम आम्ही शतशः ऋणी आहोत .

**सौ संगिता रघाटाटे (तपासे) वर्धा**


**जि. प. उच्च प्राथमिक शाळा, सिंधीविहिरी, ता. कारंजा**

# गप्पागोष्टी आणि वारली पेंटिंग एक दृढ नातं.

Covid-19 च्या पिरेड मध्ये ऑनलाईन ऑफलाइन शिक्षण सुरू होत , पण मुलांना अभिव्यक्त व्हायला वाव नव्हता. मुलांमधील सुप्त गुणांना चालना मिळून त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून पंचायत समिती हिंगणघाट शिक्षण विभागाद्वारे "गप्पा गोष्टी" नवीन नामकरण "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत गप्पा गोष्टी" हा कार्यक्रम गप्पा-गोष्टी समन्वयक कु. संगिता पेठे, विषय साधन व्यक्ती, पंचायत समिती हिंगणघाट, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वर्धा, यांच्यामार्फत घेतल्या जात आहे. गप्पा-गोष्टी समन्वयक संगिता पेठे व कु. ज्ञानाई गडवार यांनी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वर्धा येथे वारली पेंटिंग च्या कार्यशाळे मधून वारली पेंटिंग चे प्रशिक्षण घेतले , या मध्ये ज्ञानाई गरवार इयत्ता अकरावी जी . बी. एम. एम. कनिष्ठ महाविद्यालय हिंगणघाट, या विद्यार्थिनीने सन्माननीय डॉ. संगिता महाजन मॅडम यांच्याकडून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वर्धा मध्ये घेतलेल्या वारली चित्रकलेच्या धड्यांमध्ये पारंगत होऊन गप्पा गोष्टी या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना वारली पेंटिंग या पारंपरिक कलेचे ज्ञान व्हावे , त्यांच्या अंगी असलेल्या गुणांना या

चित्रकलेच्या माध्यमातून अभिव्यक्त होण्यासाठी वाव देता यावा, त्यांच्या इतर अभ्यासाच्या विषयाशी वारली चित्रकलेची सांगड घालता यावी , तसेच बाला उपक्रमाअंतर्गत पेंटिंग चे काम विद्यार्थ्यांनी स्वतः आवडीने करावे, या सर्व उद्देशाला डोळयासमोर ठेवून , स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत गप्पा गोष्टी , या कार्यक्रमामध्ये वारली पेंटिंग चे बेसिक ज्ञानापासून ते रचनात्मक ज्ञानापर्यंत , ऐकुन 15 सत्र घेऊन, विद्यार्थ्यांना या कलेचे ज्ञान मिळवून दिले . गप्पा गोष्टी या कार्यक्रमामध्ये वेगवेगळया शाळेमधून मुले झूम च्या माध्यमातून कार्यक्रमाला जॉईन होत असतात . यामध्ये पालकांचा देखील समावेश असतो . वारली पेंटिंग चे घेतले जाणारे सत्र हे या कार्यक्रमाचे एक प्रमुख आकर्षण होते . बरेच विद्यार्थी व पालक यांनी या कार्यक्रमाच्या माध्यमातून वारली पेंटिंग आपल्या वहीवरच नव्हे , तर घरातील शाळा व शाळेतील भिंतीवर काढून या कलेचा मनमुराद आनंद मिळविला . जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वर्धा येथे सन्माननीय डॉ संगिता महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या कलेचा गप्पागोष्टीच्या माध्यमातून विविध शाळेतील विद्यार्थ्यां सोबतच पालकांना देखील लाभ घेता आला . अप्रत्यक्षपणे गप्पागोष्टी या कार्यक्रमाला वारली पेंटिंग च्या सत्रामुळे आणखीनच दर्जेदार बनविण्यामध्ये सहकार्य मिळाले.

**संगिता पेठे**
**विषय साधनव्यक्ती, हिंगणघाट**


वारली पेंटिंग कार्यशाळेमुळे काय फायदा झाला?


Mulan madhye chitrakalechi aawad nirman zali

नवीन कला आत्मसात करता आली. पेंटिंग सहज व सोपी असल्याने वर्गातील प्रत्येक मूल आनंदाने सहभागी झाले.

I feel stress free.I really enjoyed it .

विस्तृत माहिती झाली, अधिक आकार माहिती झाले.

कला गुण अंगी असणारी एक व्यक्ती म्हणून ओळख झाली


आत्मविश्वास वाढला त्याचप्रमाणे शाळा सुशोभीकरण करण्यासाठी नवीन संकल्पना मिळाली.लुप्त होत चाललेल्या कलेला या कार्यशाळेमुळे नवसंजीवनी मिळाली असे म्हणणेही वावगे ठरणार नाही.

वारली पेंटिंग कार्यशाळेमुळे मी ज्या शाळेमध्ये व्हिजिटला जाते तिथे विद्यार्थ्यांना वारली पेंटिंग शिकविण्या मध्ये मला खूप मदत झाली. मुलांना पण सहज आणि सोपी वारली पेंटिंग काढणे खूप मजेचे वाटले.
या कार्यशाळेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे गप्पागोष्टी या उपक्रमांमध्ये वारली पेंटिंग चे धडे मुलांना देता आले.


**वारली पेंटिंगची अभ्यासक्रमाशी सांगड घालता आली का? कशी?**


11 responses

- होय, मुलांना यातून भौमितिक आकृत्या, लहान-मोठा, अश्या संकल्पना साध्य झाल्या.
- Yes,
- समतोल, लय, प्रमाण आणि गणितीय पायभूत संकल्पना स्पष्ट करता येते, कला विषय व कलात्मक पद्धतीने विषय मांडता येते, उपयुक्त विषय आहे. मुलांना आनंद देणारा विषय आहे.
- होय.झरीपाडा धडा शिकवला
- किचकट कन्सेप्टही यामुळे सहज समजावून सांगता येतात.कारण या चित्रकलेमध्ये चेहरा , शरिराची रचना याला विशेष महत्त्व नाही.
- हो गणित मराठी इंग्रजी हिंदी इतिहास भूगोल या सर्व विषयांची वारली पेंटिंग ची सांगड घालता येते.

**वारली पेंटिंग कार्यशाळेमुळे शाळेतील वर्गातील वातावरण बदलले का? कसे?**

- होय, मुलांच्या कल्पनांना वाव मिळाला, वर्गातील वातावरण आनंदमयी झाले.
- Yes,std,2nd standard Marathi lesson
- होय, मुले दिलेल्या कामात दंग होते आणि आनंददायी शिक्षण देता येते
- होय विद्यार्थी चित्रकला काढण्यास सुरुवात झाली
- होय.ज्या विद्यार्थ्यांना चित्रकला विषयात अजिबात आवडत नव्हती पण काहीतरी करावं असं वाटायचं ते वारली चित्रकला बिनधास्त काढतात.
- वातावरण आनंदी राहते
- Ho






वारली पेंटिंग

MARCH 12 monday

नाव ऐकताच प्रशिक्षणाचे पेंटिंग वारली
प्रशिक्षणासाठी आमची मन पटकन फिरली
ऑनलाईन, ऑफलाईनच्या चक्रात झाला
आमच्या त्रागा
शोधत होतो आम्ही थोडा स्वानंदाच्या
धागा
नृत्य, गायन, वादन, चित्र आहेत अनेक
कला
आकर्षक व शिकवायला सोपी, वारली
वाटली मला.
शाळेचे बाह्यांग सजवणे, आहे उपक्रम
बाला
कमी खर्चात ऊरु, रंग मारून लाल, निळा
काला
ध्यानच वाटले खूप दिवसांची सांच्या
भेटीगाठी.
प्रत्येकालाच गरज होती फेरा
होण्यासाठी.
प्रशिक्षणाल जर वाचन, लेखन,
शिष्यवृत्त्या असत्या मेंशन,
तर मग आले असते, भलतेच
टेंशन.



MARCH 13

या वास्तुचे नवे स्वरूप पाहून
आले सगळे थक्क
रिटायर्ड होईपर्यंत आमचा संबंध
हे मात्र पक्का.
देते धन्यवाद आता सर्वांच्या वतीने
आयोजकांना
देऊ उत्स्फूर्त प्रतिसाद,
नव्या प्रशिक्षणाच्या प्रयोगांना
फार आलय बोलून, करते आता
सांगता
कधी कधी भयानक मिळतो आनंद
असाही न मागता.

कु. अंजली राजुरकर
गोंदापूर






Samsung Triple Camera
Sangita A50








वारली एक्सप्रेस


REDMI NOTE 5 PRO
MI DUAL CAMERA










बेटी बचाओ,बेटी पढाओ
Samsung Triple Camera
Sangita A50




## <u>जिल्हा कोषागार अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र</u>

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
**जिल्हा कोषागार कार्यालय,वर्धा**
जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, सिव्हिल लाईन,वर्धा

दुरध्वी क्रमांक. 07152- 243267 email-to.wardha@zillamahakosh.in फॅक्स क्रं. 242043

क्रं.कोष/आस्था-3/सन्मान पत्र/श्रीम. महाजन/९५०/2022 दिनांक :-21/03/2022

**<u>सन्मान पत्र</u>**

**प्रति,**
**डॉ. संगीता महाजन,**
**अभिव्याख्याता,**
**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,**
**वर्धा.**

आपण आपल्या कार्यालयामार्फत जिल्हा कोषागार कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांना वारली चित्रकला प्रशिक्षण देऊन त्यांच्यातील कलागुण जोपासण्यास प्रवृत्त केले तसेच आपण जिल्हा कोषागार कर्यालयातील भिंतीवर वारली चित्रकला अतिशय सुंदररित्या कल्पकतेने काढून दिली. आपण केलेले कार्य आमच्या कार्यालयाच्या भिंतीवर कायमस्वरुपी असणार व चित्रकला स्मरणातही राहणार आहे. आमच्या कार्यालयाच्या भिंतीवर वेगवेगळया वारली आकृत्यांमध्ये पर्यावरण जागरुकता, महाराष्ट्राचे दैवत-विठ्ठल, गांधीजी - सेवाग्राम, शांतीस्तूप, जिल्हा कोषागार कार्यालय - पेन्शन विशेष, आनंदोस्तव अशी विविध चित्रे काढल्यामुळे कार्यालयाचे स्वरुप बदलून गेले असून कार्यालयीन वातावरण प्रसन्न राहण्यास मदत झालेली आहे.

म्हणून आपण केलेल्या कार्याचा सन्मान म्हणून हे सन्मानपत्र देण्यात येत आहे.

जिल्हा कोषागार अधिकारी,
वर्धा

Patra vyavhar2022




❖ वारली कलायात्री कार्यशाळा_ ebutuoyलिंक

➢ https://www.youtube.com/watch?v=XwoTzWuTd1c

➢ https://youtu.be/Rd2Xh5vlfMQ

❖ वारली फ्लीप बुक पाहण्यासाठी खालील लिंकवर जा

➢ https://online.fliphtml5.com/odpmb/sgic/#p=3